***Appendix II (ii)*, (Vide Article - 2.07(i))**

क्रमांक : एस-३०/१२/२००१/प्र.क्र.१०५/फ-३,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २०.३.२००३

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- <u>आरा गिरणी</u>
मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी
रिट पिटीशन क्र.३६५२/२००१ मध्ये दिनांक ७.२.०२
रोजी परिच्छेद १६(५) प्रमाणे दिलेला निर्णय..
संदर्भ :- शासन पत्र समक्रमांक, दिनांक २१.३.२००१

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी आरा गिरण्यांशी संबंधित रिट पिटीशन क्रमांक ३६५२/२००१ मध्ये दिनांक ७.२.२००२ रोजी परिच्छेद १६(५) मध्ये दिनांक १६.७.१९८१ पूर्वी परवानाप्राप्त परंतु १६.७.१९८१ नंतर स्थानांतरणाद्वारे १० कि.मी. संरक्षित/आरक्षित वनक्षेत्राच्या आत स्थापन झालेल्या आरा गिरण्यांबाबत, असा निर्णय दिला आहे की, " *this question is left open and the State Government shall decide the issue when the show cause notices are issued to such licensees* " या निर्णयास अनुसरुन शासनाने या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

<u>शासनाने घेतलेला निर्णय :</u>

<u>विषय क्र.३ : आरा गिरण्यांबाबत</u>

(१)(अ) दिनांक १६.७.१९८१ पूर्वी परवानाप्राप्त आरा गिरण्या परंतु त्यानंतर संरक्षित/आरक्षित वनसिमेपासून १० कि.मी. च्या आत, २८.१०.९१ पर्यंत स्थानांतराद्वारे स्थापित आरा गिरण्या त्या जागेवर चालू ठेवण्याची व परवान्याचे नूतनीकरण करण्याची मान्यता देण्यात यावी.

(ब) खाली नमूद वर्गात येणा-या दिनांक १६.७.८१ पूर्वी परवानाप्राप्त परंतु दिनांक २९.१०.९१ पासून १९.२.९७ पर्यंत संरक्षित/आरक्षित वनसिमेपासून १० कि.मी.च्या आत, स्थानांतराद्वारे स्थापित आरा गिरण्यांना त्या जागेवर चालू ठेवण्याची व परवान्यांचे नूतनीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी

१. शासनाच्या धोरणाप्रमाणे औद्योगिक वसाहतीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (M.I.D.C.) /टिंबर झोनमध्ये स्थापित आरा गिरण्या.

२. वर्षानुवर्षे आरा गिरण्या चालू राहिल्यामुळे ज्या ठिकाणी संघटित लाकूड बाजारपेठा विकसित झालेल्या आहेत. व आरा गिरण्यावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी विक्रीकर विभाग, पोलीस, वन विभाग, नगरपालिकांचे कर्मचारी व जकात नाके यासारख्या शासकीय विभागांचे प्रभावी नियंत्रण असते अशा शहरातील काही विशेष क्षेत्रातील दिनांक १६.७.८१ पूर्वीच्या परवानाप्राप्त आरा गिरण्या.

३. ज्या आरा गिरण्या प्रशासकीय कामांकरिता, शिक्षण देण्यासाठी किंवा कामगारांच्या सुरक्षिततेसाठी चालविल्या जातात विशेषतः कारागृह, डब्ल्यू.सी.एल. सारख्या कंपन्यांच्या ताब्यात असलेल्या शासकीय व निमशासकीय आरा गिरण्या.

४. नैसर्गिक आपत्तीमुळे, शासकीय/सामाजिक प्रकल्पाच्या उभारणीमुळे किंवा सक्षम अधिका-यांच्या भूमि संपादनाच्या कार्यवाहीमुळे/आदेशामुळे आरा गिरणी धारकांना इच्छा नसतानाही दुसरीकडे स्थानांतर करायला लागलेल्या आरा गिरण्या.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपण पुढील कार्यवाही करावी.

( म.सो.खंडारे )
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग